PACHORA TALUKA CO-OPERATIVE EDUCATION SOCIETY'S

Affiliated to Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University Jalgaon(M.S)
Established in 1970

श्री.शेठ मुरलीधरजी मानसिंगका
साहित्य,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
पाचोरा जि.जळगांव
फोन नं.०२५९६-२४५३१४ निवास.२४५१००

Shri Seth Murlidharji Mansingaka
Arts,Science & Commerce College
Pachora Dist.Jalgaon
Mobile No.9420350691

www.ssmmcollege.ac.in
Email Id- info@ssmmcollege.ac.in

अंत्यत महत्वाचे/तातडीचे

दि.१४/०६/२०२५

वाचा: सहाय्यक कुलसचिव व्याख्याता मान्यता विभाग,कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव यांचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/१८/५७३/२०२५ दि.१२/०६/२०२५ प्राप्त दि.१४/०६/२०२५

## ---० महत्वाची सुचना ०---

खालील सर्व वरीष्ठ महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापकांना सुचित करण्यात येते की, उन्नत अभिवृध्दी योजनेअंतर्गत (CAS) Academic Level १० to ११ and Academic Level ११ to १२ मध्ये जाण्यासाठी विद्यापीठाने विद्यावर्धिनी महाविद्यालय,धुळे येथे शिबीर आयोजीत केले असुन पात्र सहाय्यक प्राध्यापकांनी विहीत नमुन्यातील प्रस्ताव **विद्यावर्धिनी महाविद्यालय,धुळे** यांचेकडे **दि.३० जुन २०२५** पर्यंत सादर करावेत. मुदतीनंतर आलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

श्री.शे.मु.मा.साहित्य,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पाचोरा जि.जळगांव

डॉ.शिरीष बुधा पाटील
प्राचार्य
श्री.शेठ मुरलीधरजी मानसिंगका
साहित्य,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
पाचोरा-४२४२०१,जि.जळगांव

सोबत:संदर्भिय पत्र

प्रति,

१. प्रा.श्रीराम तोताराम सुर्यवंशी
२. प्रा.राजेश भामट्या वळवी
३. डॉ.क्रांती वासुदेव सोनवणे
४. प्रा.अतुल साहेबराव पाटील
५. डॉ.शरद भिमराव पाटील
६. डॉ.माणिक पोपट पाटील
७. डॉ.शारदा दशरथ शिरोळे
८. प्रा.स्वप्निल युवराज भोसले
९. प्रा.प्रदिप लक्ष्मण रुद्रसवाड
१०. प्रा.अमित शरद गायकवाड
११. प्रा.शुभम दिलीपसिंग राजपुत

E:\SSMM\Notice\कॅस कॅम्प.docx

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
उमवि नगर, जळगाव-४२५००१ फोन: ०२५७-२२५७२७६, २२५७२७७फॅक्स: ०२५७-२२५८४०३, ४०६.
Umavinagar, Jalgaon Tel Nos. : ०२५७-२२५७२७६ to २२५७२७७, Fax Nos.:०२५७-२२५८४०३, ४०६
Web : www.nmu.ac.in E-mail : registrar@nmu.ac.in & dr-approval@nmu.ac.in

जा.क्र. कबचौउमवि/१८/५७३/२०२५ महत्वाचे दिनांक: १२/०६/२०२५

S.S.M.M.College,Pachora
File No. 34 CAS
Inword No.
14 JUN 2025
Name :-

प्रति,
मा.प्राचार्य/प्राचार्या,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत
कला,विज्ञान,विधी, शिक्षणशास्त्र व समाजकार्य महाविद्यालये
जळगाव, धुळे आणि नंदूरबार

विषय: उन्नत अभिवृद्धी योजनेतंर्गत (CAS) Academic Level 10 to 11 and Academic Level 11 to 12 मध्ये जाण्यासाठी आयोजित होणाऱ्या शिबिराच्या आयोजनाबाबत.

---

शिबिर आयोजक महाविद्यालय म्हणून विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे यांचेकडे प्रस्ताव सादर करणे बाबत.

संदर्भ :
१. विद्यापीठाचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/१८/१३४६/२०२४ दि. ०५.१२.२०२४
२. पंकज महाविद्यालयाचे पत्र जा.क्र. Ref.No. २२२४/२०२४ दि. ११.१२.२०२४
३. विद्यापीठाचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/१८/११६/२०२५ दि. ०५.०२.२०२५
४. विद्यापीठाचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/१८/११७/२०२५ दि. ०५.०२.२०२५
५. पंकज महाविद्यालयाचे पत्र जा.क्र. Ref.No. २२९६/२०२५ दि. १६.०४.२०२५
६. विद्यापीठाचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/१८/४९६/२०२५ दि. २२.०५.२०२५
७. विद्यावर्धिनी महाविद्यालयाचे पत्र Ref. ६८/२०२५-२६ दि. ११.०६.२०९२५

महोदय/महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न सर्व अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र, समाजकार्य महाविद्यालयातील उन्नत अभिवृद्धी योजनेतंर्गत (CAS) पदोन्नतीसाठी स्टेज एक मधून स्टेज दोन मध्ये व स्टेज तीन मध्ये (Academic Level १० ते ११ आणि ११ ते १२) जाण्याकरीता पात्र अध्यापकांच्या प्रस्तावांची छाननी तथा मूल्यमापनासाठी जळगाव,धुळे आणि नंदूरबार जिल्हानिहाय शिबिर वर्षातून दोन वेळेस आयोजित केले जाते.

तथापि, सदरहू शिबीर वर्षातून तीन वेळेस अर्थात चार महिन्यातून एकदा आयोजित करावे अशी विंनती विविध प्राधिकरण सदस्यांनी वेळोवेळी मा. कुलगुरु महोदयांकडे केलेली होती. मा. कुलगुरु महोदयांनी उपरोक्त विनंतीचा विचार करता वर्षातून तीन वेळेस सदरहू शिबीर आयोजन करण्यासाठी सहमती दर्शविलेली आहे.

त्यानूसार संदर्भ पत्र क्र. १ अन्वये आयोजक महाविद्यालय म्हणून विद्यापीठाने परिपत्रक निर्गमित केले गेले. त्यानुसार संदर्भ पत्र. क्र. २ अन्वये पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्था संचलित, पंकज महाविद्यालय, चोपडा यांनी वार्षिक शिबिर आयोजनासाठी जळगाव जिल्हाकरीता सहमती दर्शविली. तथापि धुळे आणि नंदूरबार जिल्ह्याकरीता कुठल्याही महाविद्यालयाने आयोजक महाविद्यालय म्हणून सहमती दर्शविलेली नव्हती. त्याअनुषंगाने संदर्भ पत्र क्र. ३ आणि ४ अन्वये पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्था संचलित, पंकज महाविद्यालय, चोपडा यांना वार्षिक शिबिर आयोजनासाठी जळगाव जिल्हाकरीता आयोजक महाविद्यालय म्हणून निश्चित करण्यात आलेले होते. त्याचबरोबर धुळे आणि नंदूरबार जिल्ह्याकरीता कोणताही प्रस्ताव आला नसल्याने चोपडा हे शहर धुळे आणि नंदूरबार जिल्ह्याच्या जवळ असल्याने धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यासाठी सुद्धा पंकज महाविद्यालयास संधी देण्यात आलेली होती.

वरीलप्रमाणे व्याख्याता मान्यता विभागातर्फे विद्यापीठ पत्र जा.क्र. कबचौउमवि/१८/११७/२०२५ दि. ०५.०२.२०२५ अन्वये विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांना पत्र निर्गमित करण्यात आले. तसेच प्राचार्य, पंकज महाविद्यालय, चोपडा यांना सुद्धा कळविण्यात आले होते.

...२

तथापि, संदर्भ पत्र क्र. ५ अनवये मा. प्राचार्य, पंकज महाविद्यालय, चोपडा यांचे पत्र Ref. No. २२९६ दि. १६.०४.अन्वये त्यांचेकडे १९ प्रस्ताव आवक झालेले असून निवड समिती सदस्यांचे मानधन, प्रवासखर्च व इतर खर्च पाहता प्रस्तावातून येणाऱ्या उत्पन्नात शिबिर घेणे शक्य होणार नाही असे विद्यापीठास कळविले आहे.

त्याअनुषंगाने संदर्भ पत्र क्र. ६ अन्वये दि. २७ मे, २०२५ रोजी विविध शिक्षक संघटनांची उपरोक्त संदर्भात चर्चा करण्यासाठी ऑनलाईन बैठकही आयोजित केली होती. त्यातही मा. प्र. कुलगुरु महोदयांनी शिक्षक संघटनांना यासंदर्भात सुचना, शिफारशी करण्यासाठी आवाहन केले होते.

त्याअनुषंगाने संदर्भ पत्र क्र. ७ अन्वये दि. ११ जुन, २०२५ रोजी मा. प्राचार्य, विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे यांनी मा. प्र.कुलगुरु महोदयांना पत्र लिहिले असून त्यात प्राध्यापकांचे हित लक्षात घेऊन सदरहू शिबीर आयोजित करण्यास तयार आहोत असे कळविले आहे.

**त्याअनुसार कळविण्यात येते की,**

स्टेज एक मधून स्टेज दोन मध्ये व स्टेज तीन मध्ये (Academic Level १० ते ११ आणि ११ ते १२) विद्यावर्धिनी महाविद्यालय धुळे यांना जळगाव, धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यासाठी आयोजक महाविद्यालय म्हणून निश्चित करण्यात आलेले आहे. यापूर्वी पंकज महाविद्यालयाकडे प्राप्त १९ प्रस्ताव हे विद्यावर्धिनी महाविद्यालय धुळे यांना वर्ग करण्यात येणार असून शिबिरासंदर्भातील कार्यवाही ते करणार आहेत.

शिक्षकांचे हीत लक्षात घेता स्टेज एक मधून स्टेज दोन मध्ये व स्टेज तीन मध्ये (Academic Level १० ते ११ आणि ११ ते १२) मधील नव्याने प्रस्ताव दाखल करण्यासाठी दि. ३० जून, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, कबचौउमवि कार्यक्षेतील या स्टेजच्या संबंधित शिक्षकांनी विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे यांचेकडे दि. ३० जून, २०२५ पर्यंत प्रस्ताव सादर करावेत. त्यानंतर कुठलीही मुदतवाढ देण्यात येणार नाही. तद्नंतर विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे यांनी शिबिर आयोजनासंदर्भातील कार्यवाही करावी.

कृपया प्राचार्य यांनी सदरहू पत्र महाविद्यालयांच्या अधिनस्थ सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावे व सदरहू पत्र नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात यावे ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू

सहायक कुलसचिव
(व्याख्याता मान्यता विभाग)

प्रत :

१. मा. प्राचार्य, पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्था संचलित, पंकज महाविद्यालय, चोपडा
- यांनी त्यांचेकडे प्राप्त १९ प्रस्ताव आणि शुल्क रु. ३०००/- प्रती प्रस्ताव या प्रमाणेची रक्कम मा. प्राचार्य, विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे यांच्याकडे वर्ग करावेत.

२. मा. प्राचार्य, विद्यावर्धिनी सभेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धुळे
- यांनी उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन शिबिर आयोजनासंदर्भातील कार्यवाही करावी.

प्रत माहितीस्तव:

१) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव
२) मा.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि,जळगांव
३) मा.उपकुलसचिव, मा.कुलगुरु कार्यालय,कबचौउमवि,जळगांव
४) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि,जळगांव
५) मा.कुलसचिव कार्यालय, कबचौ उमवि,जळगांव

staffapp\ext.let.25\PN.59